<u>नियमित दिवाणी मुकदमा क्र. ८६/२०११ मधील नि. १ वरील अंतिम आदेश</u>

यातील वादी गैरहजर आहेत. वादीतर्फे वकील हजर आहेत. सदरचा दावा आजरोजी काढून टाकण्यावर नेमला गेला आहे. याउपर देखील वादी हे गैरहजर असून वादीतर्फे मुदत अर्ज दिला गेलेला आहे. मात्र वादी यांनी दिलेला नि. ४७ वरील मुदत अर्ज त्यातील कारण संयुक्तीक नसल्याने नामंजूर करण्यात आलेला आहे. यापूर्वीचा वादींचा नि. ५० वरील मुदत अर्ज देखील नामंजूर करण्यात आलेला होता. सदरचा दावा हा दि. २४/१०/२०१३ पासून म्हणजेच जवळ जवळ १ वर्षापासून चौकशीवर प्रलंबित आहे. वादी यांना सदरचा दावा सुरु करण्यासाठी जवळ जवळ १२ तारखा देण्यात आलेल्या आहेत. मात्र वादी यांनी दावा सुरु करण्यासाठी कोणतेही प्रयत्न केलेले नाहीत. सदर दाव्यामधील बरेच पक्षकार हे ज्येष्ठ नागरिक आहेत. त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांचे दावे प्राधान्य देवून निकाली करणे आवश्यक आहे. मात्र त्यामुळे वादी यांच्या गैरहजेरीमुळे बाधा येत आहे. त्यामुळे अभिलेखावरुन वादी हे सदरचा दावा पुढे चालू ठेवण्यास उत्सुक नसल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे खालीलप्रमाणे आदेश पारीत करणेत येत आहे.

<u>—: अंतिम आदेश :—</u>

दावा खर्चासह रद्द करणेत येत आहे.

मालवण,
दिनांक : २६/०२/२०१५.

(खा. अ. भेंडवडे)
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), मालवण.